# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## शिक्षक मान्यता विभाग -१
## परिपत्रक

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accreditied-2015
B Grade (CGPA 2.62

**विषय : महाविद्यालयातील प्राचार्य म्हणून पाच वर्षाचा कार्यकाल पूर्ण केलेल्या प्राचार्यांच्या पुनःश्च एकदा पाच वर्षासाठी पुनर्नियुक्तीसंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

वाचा : १)विद्यापीठ अनुदान अयोग दिनांक ३० जून, २०१० ची अधिसूचना
२)महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११/(२५/११)/विशि-१ दिनांक १५-०२-२०११
३)विद्यापीठ अनुदान आयोगाची चौथी सुधारणा (4th Amendment) दिनांक ११-०७-२०१६
४)महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३/१७/विशि-१ दिनांक ०४-०३-२०१७
५)महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. युएनआय/(१३/१७)अधि-३/विशि-१/३४४१ दिनांक १७-०३-२०१८
६) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१०१/१८/विशि-१ दिनांक १६-०४-२०१८
७)महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. युएनआय/(१३/१७)/अधी.३/विशि-१/४६७४ दिनांक १७-०४-२०१८

या परिपत्रकान्वये सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित सर्व संस्थाचाल, सचालक व प्राचार्य यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, संलग्नित महाविद्यालयातील पाच वर्षाच्या कालावधीसाठी मान्यता असलेल्या प्राचार्यांचा पाच वर्षाचा कालावधी पूर्ण होत आहे अशा प्राचार्यांच्या पुनःश्च एकदा प्राचार्यपदी पुनर्नियुक्तीसंदर्भात महाविद्यालयांनी अथवा संबंधित संस्थांनी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेमधील कलम ५.१.६ (d) मध्ये The Term of appointment of the college principal shall be FIVE years with eligibility for reappointment for one more term only after a similar selection committee. असे नमूद केले आहे. सदरची अधिसूचना संदर्भ क्र. २ अन्वये महाराष्ट्र शासनाने स्विकारली आहे.

२. विद्यापीठ अनुदान अयोगाच्या दिनांक ११ जुलै, २०१६ रोजीच्या 4th Amendment नुसार The Term of appointment of the College Principal shall be five years with eligibility for reappointment for one more term only after a similar selection committee process which shall take into account an external peer review, its recommendations and its outcomes. The framework of the external peer review shall be specified by the UGC. म्हणजेच प्राचार्यांनी प्रथमत: पाच वर्षाचा कालावधी पूर्ण केल्यानंतर त्यांना पुन्हा एकदा पुढील पाच वर्षाकरीता पुनर्नियुक्ती देता येऊ शकते. यामध्ये बाह्य तज्ज्ञांनी (External peer review committee) केलेल्या शिफारशी फक्त निवड समितीसमोर ठेवून प्राचार्यांस पुढील पाच वर्षाकरीता पुनर्नियुक्ती देता येवू शकते. सदरची चौथी सुधारणा महाराष्ट्र शासनाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३/१७/विशि-१ दिनांक ०४ मार्च, २०१७ अन्वये स्वीकारलेली आहे.

३. संदर्भ क्र. ५ अन्वये मा. संचालक, उच्च शिक्षण यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ११-०७-२०१६ च्या नोटीफिकेशनमध्ये प्राचार्यांच्या नियुक्तीसंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ३० जून, २०१० रोजीच्या अधिसूचनेतील परिच्छेद क्र. ५.१.६ (d) च्या संदर्भात शासनाकडे मार्गदर्शन मागविले होते.

४. संदर्भ क्र. ६ अन्वये महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. ५ अन्वये मा. संचालक, उच्च शिक्षण यांच्या पत्रास अनुसरून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ११-०७-२०१६ च्या नोटीफिकेशनमध्ये प्राचार्यांच्या नियुक्तीसंदर्भात पुढीलप्रमाणे मर्गदर्शन केले आहे. **संलग्नित महाविद्यालयातील पाच वर्षाची मान्यता असलेल्या प्राचार्यांना पुढील पाच वर्षासाठी पुनर्नियुक्ती देताना पुनःश्च जाहिरात न देता सेवेत**

**असणाऱ्या प्राचार्यांना पुनर्नियुक्त करताना External peer review (बाह्य तज्ज्ञ) व Similar selection Committee या बाबीना सामोरे जाऊन पुढील पाच वर्षाकरिता पुनर्नियुक्ती करता येऊ शकेल अशी उच्च शिक्षण संचालनालयाची धारणा महाराष्ट्र शासनाने पक्की केली आहे.** त्यासंदर्भात मा. संचालक, उच्च शिक्षण यांनी संदर्भ क्र. ७ अन्वये सर्व विभागीय सहसंचालक व सर्व कुलसचिव अकृषी विद्यापीठे यांना कळविले आहे. त्यानुसार उक्त बाबी विचारात घेता महाविद्यालयांनी ज्या प्राचार्यांना ५ वर्षाची मान्यता देण्यात आली होती. त्यांना पुन्हा एकदा पाच वर्षासाठी पुनर्नियुक्ती देताना जाहिरात देण्याची गरज नाही.

५. संस्थेने महाविद्यालयातील प्राचार्यांचा पाच वर्षाचा कालावधी संपण्याच्या दोन महिने अगोदर सदरची प्रक्रिया राबवावी.

६. महाविद्यालयांनी/संस्थांनी External peer review समितीमधील दोन सदस्यापैकी (i) Nominee of Vice-Chancellor of the affiliating University नुसार मा. कुलगुरूंचे नामनिर्देशित प्रतिनिधी यांचे नामनिर्देशन विद्यापीठाकडून पत्र पाठवून घ्यायचे आहे. तसेच (ii) Nominee of the Chairman, University Grants Commission नुसार मा. अध्यक्ष, विद्यापीठ आनुदान आयोग यांचे प्रतिनिधीबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पश्चिम विभागीय कार्यालय, पुणे यांचेकडे पत्र पाठवून एका सदस्याचे नामनिर्देशन संस्थेने परस्पर संपर्क साधून करून घ्यायचे आहे.

७. प्रथमता महाविद्यालय/संस्थेने External peer review (बाह्य तज्ज्ञ) समितीची बैठक आयोजित करून सदरची प्रक्रिया पूर्ण करावी. सदर समितीच्या शिफारशीनंतरच संस्थेने सदर शिफारशीसह विद्यापीठास निवड समितीची मागणी करावी.

८. विद्यापीठाकडून निवड समिती दिल्यानतंर निवड समितीची बैठक आयोजित करून रितसर निवड प्रक्रिया पूर्ण करून निवड समितीच्या शिफारशीसह अहवाल विद्यापीठाकडे ७२ तासाच्या आत मान्यतेसाठी सादर करावा. त्यावर प्राचार्यांच्या विद्यापीठाकडून प्राचार्यांच्या मान्यतेची कार्यवाही केली जाईल तद्नंतर प्राप्त झालेल्या प्रस्ताव/अहवालावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जाणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**जा.क्र.. सोविसो/शिमा/परिपत्रक/२०१७-१८/**4232
**दिनांक :** 18 MAY 2018

**(प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील)**
**विशेष कार्यासन अधिकारी,**
शैक्षणिक, संशोधन आणि विकास

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक/संस्थाचालक,**
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**सुचनाः** सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या www.su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील Educational Research and Development या मथळयाखाली Teacher Approval Section-१ मध्ये Pricipal Reappointment या लिंकवर उपलब्ध आहे.